RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

# दहिवली दरडग्रस्तांच्या मदतीसाठी रोटरी क्लब ऑफ लोटे वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविणार

**राकेश कोळी / खेड :**

खेड तालुक्यातील दहिवली येथील शेलारवाडी परिसरात मुसळधार पावसाने झालेल्या भीषण दरड दुर्घटनेनंतर बाधित कुटुंबांच्या मदतीसाठी विविध सामाजिक संस्था पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर रोटरी क्लब ऑफ लोटेच्या पदाधिकारी व सदस्यांनी दरडग्रस्त कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करत मदतीचा हात दिला.



यावेळी रोटरी क्लबच्या सदस्यांनी दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कुटुंबीयांचे सांत्वन केले तसेच जखमी आणि स्थलांतरित कुटुंबीयांची विचारपूस करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. घडलेल्या दुर्दैवी घटनेबद्दल त्यांनी तीव्र दुःख व्यक्त करत या कठीण प्रसंगी रोटरी क्लब कायम त्यांच्या पाठीशी उभा राहील, असा विश्वास दिला.

केवळ मदत साहित्याचे वाटप करून न थांबता रोटरी क्लब ऑफ लोटेच्या सदस्यांनी संपूर्ण दरडग्रस्त भागाची पाहणी केली. परिसरातील नुकसान, पुनर्वसनाची गरज आणि नागरिकांसमोरील अडचणींचा आढावा घेत त्यांनी दीर्घकालीन मदतीचा संकल्प जाहीर केला.

यावेळी पुढील एक वर्ष दहिवलीच्या दरडग्रस्त भागासाठी सातत्याने काम करण्याचा मानस रोटरी क्लब ऑफ लोटेने व्यक्त केला. या कालावधीत शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि विविध सामाजिक उपक्रम राबवून बाधित कुटुंबांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच दुर्घटनेत नुकसान झालेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठीही आवश्यक ते सहकार्य आणि प्रयत्न करण्यात येतील, असे रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ लोटेच्या अध्यक्षा सोनाली रहाटे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा श्रावणी सुर्वे, संदीप सुर्वे, उत्तमकुमार जैन, संकेत चाळके, शिरीष चौधरी, तुषार दिवेकर, मनीष वाडकर, मिहिर वारणकर, राजू ठसाळ, श्री. ठाकरे तसेच स्वयंसेवक शाम शिर्के आणि उमेश भोसले उपस्थित होते.

दरम्यान, दहिवलीतील शेलारवाडी येथे झालेल्या या भीषण दुर्घटनेत एकाच कुटुंबातील दोनजणांचा मृत्यू झाला असून एक वृद्ध महिला गंभीर जखमी झाली आहे. संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने परिसरातील १६ कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले असून प्रशासनासह विविध सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांकडून मदतकार्य सुरू आहे. अशा परिस्थितीत रोटरी क्लब ऑफ लोटेने जाहीर केलेली दीर्घकालीन मदत योजना आपत्तीग्रस्त कुटुंबांसाठी मोठा दिलासा ठरणार असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

Ratnagiri Edition
Jul, 14 2026 Page No, 3
https://epaper.prahaar.in

Postal Reg. No. RTR/013/2024-2026
कोकणचे सर्वाधिक खपाचे दैनिक
रत्नागिरी टाइम्स
रत्नागिरी
• रत्नागिरी • सिंधुदुर्ग • रायगड • मुंबई • कोल्हापूर | बुधवार, दि. १५ जुलै २०२६ | • पृष्ठे १० | • किंमत रु. ५.००

# दहिवली दरडग्रस्तांच्या मदतीला धावले रोटरी क्लब ऑफ लोटे

खेड, १४ जुलै (वार्ताहर): खेड तालुक्यातील दहिवली येथील शेलारवाडी भागात झालेल्या भीषण दरड दुर्घटनेनंतर बाधित कुटुंबांच्या मदतीसाठी रोटरी क्लब ऑफ लोटे पुढे सरसावला आहे. रोटरी क्लबच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी दरडग्रस्त कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. तसेच दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कुटुंबीयांचे सांत्वन करत जखमी आणि स्थलांतरित नागरिकांची विचारपूसही केली.

यावेळी रोटरी क्लबने संपूर्ण दरडग्रस्त भागाची पाहणी करून पुढील एक वर्ष दहिवली परिसरात शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प जाहीर केला. तसेच नुकसानग्रस्त घरांच्या पुनर्बांधणीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाहीही दिली. या मदत उपक्रमात रोटरी क्लब ऑफ लोटेच्या अध्यक्षा सोनाली रहाटे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा श्रावणी सुर्वे, संदीप सुर्वे, उत्तमकुमार जैन, संकेत चाळके, शिरीष चौधरी, तुषार दिवेकर, मनीष वाडकर, मिहिर वारणकर, राजू ठसाळ, श्री. ठाकरे तसेच स्वयंसेवक शाम शिर्के आणि उमेश भोसले उपस्थित होते.

Postal Reg. No. RTR/013/2024-2026

कोकणचे सर्वाधिक खपाचे दैनिक

# रत्नागिरी टाइम्स

रत्नागिरी

• रत्नागिरी • सिंधुदुर्ग • रायगड • मुंबई • कोल्हापूर बुधवार, दि. १५ जुलै २०२६ • पृष्ठे १० • किंमत रु. ६.००



दहिवली येथील शेलारवाडी भागात झालेल्या भीषण दरड दुर्घटनेनंतर बाधित कुटुंबांना रोटरी क्लबच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी दरडग्रस्त कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.